


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ३५८ वा शनिवार दि ०२ मे २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# फडणवीसांचे विश्वासू पोलीस अधीक्षक तुषार दोशींवर कारवाई; राजकीय काटशहामुळे शिंदेंची नीलम गोऱ्हेंना विधानपरिषदेची बक्षिसी?

**वृत्तसंस्था/ मुंबई**

आगामी विधान परिषद निवडणूक बिनविरोध होणार असल्याचे निश्चित झाले आहे. अर्ज भरण्याचा अखेरच्या दिवशी, गुरुवारी शिवसेनेकडून उपसभापती नीलम गोऱ्हे यांना, तर प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांना उमेदवारी देण्यात आली. शिवसेना (उबाठा) पक्षाकडून अंबादास दानवे यांनी अर्ज दाखल केला. या उमेदवारीवरून नाराज झालेल्या काँग्रेसने अखेर माघार घेत दानवे यांना पाठिंबा दिला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून झिशान सिद्दीकी यांनी अर्ज दाखल केला. विधान परिषदेच्या नऊ जागांसाठीची द्वैवार्षिक निवडणूक आणि प्रज्ञा सातव यांनी काँग्रेस पक्षाचा राजीनामा देत भाजपमध्ये प्रवेश केल्यामुळे रिक्त झालेल्या जागेची पोटनिवडणूक होत आहे. या निवडणुकीत भाजपने त्यांच्या उमेदवारांची आधीच घोषणा केली होती. भाजपने विधान परिषदेसाठी माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे, प्रमोद जठार आणि सुनील कर्जतकर यांना उमेदवारी दिली आहे. त्यातच शिवसेनेकडून तिसरा उमेदवार दिला जाणार का? बच्चू कडू यांना उमेदवारी मिळणार का? असे प्रश्न उपस्थित करण्यात येत होते. गुरुवारी सकाळी कडू यांनी आपला प्रहार जनशक्ती हा पक्ष शिवसेनेत विलीन करत असल्याची घोषणा केली. याचवेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परिषदेची दुसरी जागा नीलम गोऱ्हे यांना जाहीर केली. सातारा जिल्हा परिषदेच्या निवडणुकीदरम्यान शिवसेनेचे मंत्री शंभुराज देसाई यांना झालेल्या मारहाणीसाठी जबाबदार असलेले पोलिस अधीक्षक तुषार दोशी यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी, असे निर्देश गोऱ्हे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान दिले होते. यामुळे परिषदेत जोरदार वादंग निर्माण झाला होता. अखेर, या निर्देशांचा विचार करण्यासाठी घटनातज्ज्ञांचा सल्ला घेण्याचा निर्णय सभापती राम शिंदे यांनी घेतला. मुख्यमंत्र्यांचे विश्वासू म्हणून ओळखले जाणारे पोलिस अधिकारी दोशी यांच्यावर कारवाईचे निर्देश देत राजकीय काटशह दिल्याने त्याचे बक्षीस गोऱ्हे यांना दिल्याचे बोलले जात आहे. राष्ट्रवादीकडे असलेल्या एकमेव जागेसाठी अनेक जण इच्छुक असल्याचे बोलले जात होते. त्यामुळे उमेदवार जाहीर न करताच थेट एबी फॉर्म देऊन झिशान सिद्दीकी यांना अर्ज दाखल करण्यास सांगण्यात आले. यावेळी त्यांच्यासोबत पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि आमदार सना मलिक उपस्थित होत्या. रिक्त जागांइतकेच उमेदवारांचे अर्ज आल्याने निवडणूक बिनविरोध होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. शिवसेना (उबाठा) पक्षाने दानवे यांना उमेदवारी दिल्याने बुधवारी काँग्रेसने आपला उमेदवार देणार असल्याचे जाहीर केले होते. परंतु, गुरुवारी सकाळी महाविकास आघाडीच्या नेत्यांची बैठक झाली. या बैठकीत दानवे हे मविआचे एकमेव उमेदवार असावेत, अशी मागणी उबाठाकडून करण्यात आली. अखेर, काँग्रेसने माघार घेत उमेदवार देणार नसल्याचे जाहीर केले. बारामती पोटनिवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर काँग्रेसने माघार घेतली होती. त्यानंतर पुन्हा एकदा पक्षाला तोंडघशी पडावे लागले आहे.



अवघ्या काही दिवसांपूर्वी बारामती पोटनिवडणुकीदरम्यान काँग्रेसने मोठा गाजावाजा करत उमेदवारी जाहीर करण्याची घोषणा केली होती. मात्र, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर उमेदवारी मागे घेण्याची वेळ आली. त्यानंतर आता विधान परिषद निवडणुकीतही उमेदवार न देण्याचा निर्णय जाहीर करण्याची वेळ काँग्रेसवर आली. त्यामुळे काँग्रेसच्या विशेषत: सपकाळ यांच्या निर्णयामुळे पक्षांतर्गत नाराजी पसरल्याचे बोलले जात आहे. विधान परिषदेच्या एका जागेसाठीच्या पोटनिवडणुकीसाठी आणि नऊ जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाने दोन स्वतंत्र निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. पोटनिवडणुकीसाठी मिलिंद बोरीकर (भाप्रसे) यांची, तर द्वैवार्षिक निवडणुकीसाठी निरीक्षक म्हणून मिलिंद शंभरकर (भाप्रसे) यांची नियुक्ती केली आहे.

# आकाशवाणी निवेदिका, नगरसेविका ते विधानपरिषद; उपमुख्यमंत्र्यांच्या ठाण्यात भाजपचा तिसरा आमदार

**वृत्तसंस्था/ ठाणे**

ठाणे महानगरपालिकेत भाजपकडून सलग दोन टर्म नगरसेवक म्हणून कर्तृत्व गाजवल्यानंतर पक्षाची संघटनात्मक जबाबदारी पार पाडणाऱ्या माधवी नाईक यांना भाजपने विधान परिषदेची उमेदवारी दिली. नाईक यांच्या माध्यमातून ठाणे शहराला भविष्यात, आमदार संजय केळकर व निरंजन डावखरे यांच्यानंतर माधवी नाईक यांच्या रूपाने महिला आमदार लाभणार आहे. त्यामुळे शहरातील पक्षीय संघटन मजबूत होण्यासह तळागाळातील कार्यकर्त्यांना बळ मिळण्याची शक्यता आहे. ठाण्यातील श्रीरंग सोसायटी परिसरात राहणाऱ्या माधवी नाईक यांनी १९९७ साली या प्रभागातून महापालिकेची निवडणूक लढवली. त्यावेळी नाईक या तत्कालीन शिवसेनेच्या ठाणे जिल्हा महिला आघाडी प्रमुख असणाऱ्या अनिता बिर्जे यांचा निसटता पराभव करून ठाणे पालिकेवर निवडून गेल्या होत्या. त्यानंतर २००२ सालीही त्यांनी निवडणुकीत विजयश्री प्राप्त केली. मात्र २००७ मध्ये त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. राजकारण म्हणजे समाजसेवेचे माध्यम आहे, सत्तेचे नव्हे,फक्त असा ठाम विश्वास व्यक्त करत त्यांच्या नेतृत्वगुणांमुळे त्यांना पक्षातील जबाबदाऱ्या मिळत गेल्या. महिला मोर्चा अध्यक्षा, प्रदेश उपाध्यक्ष, आणि गेली तीन वर्षे अत्यंत जबाबदारीच्या भाजप प्रदेश सरचिटणीसपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. विशेष म्हणजे, केंद्र सरकारच्या विमानतळ प्राधिकरणाच्या संचालकपदावर देखिल त्यांची नियुक्ती करण्यात आली. या जबाबदाऱ्या लीलया सांभाळताना त्यांनी दुष्काळग्रस्त भागात सलग दहा दिवस दौरे करून जलसिंचन योजनांचा अभ्यास केला. त्या क्षेत्रामधील उपाययोजना प्रत्यक्षात राबवल्या. त्यांच्या अर्थ फाउंडेशन संस्थेच्या माध्यमातून संस्कारवर्ग, व्याख्यानमाला, करिअर मार्गदर्शन आणि महिलांचे समुपदेशन असे उपक्रम राबवले. अखेर भाजपने त्यांना विधान परिषदेची उमेदवारी देत नवी संधी दिल्याने शहरातील पक्षाच्या जुन्या जाणत्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. बी.ए. शिक्षण पूर्ण केल्यानंतर चर्चगेट येथे शासकीय विधी महाविद्यालयात नाईक यांनी एल.एल.बी.साठी प्रवेश घेतला. प्रतिथयश ॲड. विजय



आगाशे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी वकिली क्षेत्रात पाऊल ठेवले. राजकारणाबरोबरच त्या कला आणि सांस्कृतिक क्षेत्रातही सक्रिय राहिल्या आहेत. त्यांनी आकाशवाणीवर निवेदिका म्हणून तसेच जंगल बुक व काही माहितीपटांसाठी आवाज देत डबिंग क्षेत्रातही काम केले आहे.

# झाकली मूठ बिनविरोधची



दोन दिवस शड्डू ठोकून झाल्यानंतर ऐन वेळी राजकीय पक्षांनी व्यावहारिक भूमिका घेतल्यामुळे विधान परिषदेच्या कथित लढाईची गाडी अखेर बिनविरोधच्या वळणावर येऊन थांबली. भारतीय जनता पक्षाने निष्ठावंतांना दिलेली संधी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेले बेरजेचे राजकारण, उद्धव ठाकरे यांनी खाली टाकलेले निवडणुकीच्या राजकारणाचे शस्त्र आणि काँग्रेसने पुन्हा म्यान केलेली उमेदवारीची तलवार... असे राजकारण खेळून झाल्यावर सर्वांनीच संख्याबळाच्या वास्तवाचे भान राखल्याने लढाई हे पेल्यातले वादळच ठरले. आठवडाभराच्या घडामोडींमधून एकीकडे महायुतीचे वर्चस्व आणि अंतर्गत विस्ताराची चढाओढ दिसून आली. त्यात ङ्गप्रहारफ संघटनेच्या अस्तित्वाच्या समिधा टाकून बच्चू कडू यांनी सुरक्षित आमदारकीचा प्रसाद मिळवला. कितीही जोर लावला, तरी पार्थ पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये एकतर्फी हुकूमत चालवण्यासाठी आणखी पुण्याई-वजन कमवावे लागेल, तोवर काही काळ सबुरी दाखवण्याविना पर्याय नाही, हासुद्धा संदेश अनुभवी नेत्यांनी दिला. दुसरीकडे राज्यसभेपाठोपाठ यंदासुद्धा ङ्गपुढील निवडणुकांत प्राधान्यफ अशा आश्वासनाव्यतिरिक्त काँग्रेसच्या हाती काही लागले नाही; त्यामुळे त्यांना ही माघार आघाडीच्या कथित ऐक्याला अर्पण करावी लागली. विधान परिषदेच्या नऊ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीमध्ये संख्याबळाचे गणित लक्षात घेता महायुतीचेच वर्चस्व स्पष्ट होते. आतापर्यंतच्या सर्व निवडणुकांत आयात उमेदवारांची मेगाभरती केल्याची टीका झालेल्या भाजपने यंदा निष्ठावंतांना झुकते माप दिले. उमेदवारांच्या यादीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा एकहाती वरचष्मा पुन्हा स्पष्ट झाला असून, त्यात सुनील कर्जतकर, माधवी नाईक, प्रमोद जठार आणि संजय भेंडे यांना संधी मिळाली; तसेच विधानसभेच्या निवडणुकीत माघारीसाठी विवेक कोल्हे दिलेला शब्दही पक्षाने पाळला आहे. एकनाथ शिंदे यांनी परिषदेचे उपसभापतीपद सांभाळलेल्या अनुभवी नीलम गोऱ्हे यांना पुन्हा संधी देऊन अन्य इच्छुकांच्या सुसाट गाड्यांना ब्रेक लावला. मात्र, विधानसभेत पराभव पत्करल्यानंतरही विविध आंदोलनांमधून आक्रमक बाणा जपणारे बच्चू कडू यांना आमदारकीची लॉटरी लागली. या निमित्ताने शिंदे यांनी बेरजेचे राजकारण केलेच; त्यासह अजित पवार यांच्या निधनामुळे निर्माण झालेल्या पोकळीत पक्षविस्ताराचे इरादेही स्पष्ट केले. त्यामध्ये त्यांनी प्रसंगी भाजपला आव्हान देऊन विदर्भात जमवाजमव सुरू केली. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये ङ्गपार्थ ब्रिगेडफने जोर धरल्याची चर्चा होती. मात्र, त्यांचे विश्वासू विक्रम काकडे यांचे नाव मागे पडून, झिशान सिद्दिकी यांच्या रूपाने अल्पसंख्याक समाजाला पक्षाने प्राधान्य दिले. त्या तुलनेत केवळ एका जागेवरून ङ्गमविआफमध्ये मानापमानाचे प्रयोग रंगले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शरद पवार गटाने अजित पवार गटाशी आणि उबाठा गटाने मनसेशी घरोबा करून काँग्रेसला वाऱ्यावर सोडलेच होते. नंतर राज्यसभेसाठी शरद पवार यांच्या नावाबाबत काँग्रेसनेत्यांना पक्षश्रेष्ठींच्या आदेशाला ङ्गममंफ म्हणण्याशिवाय पर्याय नव्हता. बारामतीच्या पोटनिवडणुकीतही माघार घ्यावी लागल्याने झालेल्या काँग्रेसचा अवसानघात झाला; त्याची विधान परिषदेच्या निवडणुकीतही पुनरावृत्ती झाली आहे. ठाकरे घराण्याची परंपरा सोडून प्रथमच उद्धव ठाकरे निवडणूक-सत्तेच्या राजकारणात उतरले; मात्र हल्ली त्यांचा या राजकारणातील रस कमी झाला असावा, असे अनेकदा जाणवले. त्यामुळेच त्यांनी पुन्हा मार्गदर्शकाच्या भूमिकेला पसंती दिल्याचे दिसते. आता आदित्य ठाकरे यांच्याकडे पक्षाचे सुकाणू जाणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. अंबादास दानवे यांची उमेदवारी ऐन वेळी जाहीर करून उबाठा गटाने काँग्रेसला खिंडीत गाठले. शरद पवार यांच्या पक्षातील बऱ्याच काळातली सामसूम आणि अजित पवार यांच्या निधनानंतर राज्यातील पोकळी, अशा स्थितीत पक्षविस्ताराची सर्वाधिक संधी काँग्रेसकडे आहे. मात्र, मित्रपक्षांमागे काँग्रेसची फरफट कधीपर्यंत सुरू राहणार, याचा अंदाज येत नाही. त्रयस्थांना मात्र अशा प्रत्येक निवडणुकीत ङ्गकाँग्रेस उभी राहिली; आम्ही नाही पाहिली,फ या लहान मुलांबाबतच्या उक्तीची आठवण होते, एवढेच.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# कोल्हापुरी चपला बनवणाऱ्या पारंपरिक लेदर कारागिरांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम

**मुंबई/वृत्तसंस्था**

महाराष्ट्रातील कारागिरांच्या सृजनातून जन्मलेली कोल्हापुरी चप्पल आज जागतिक लक्झरी उत्पादन बनली असल्याचे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले 'मेड इन इंडिया'ची ताकद महाराष्ट्राने जगासमोर प्रभावीपणे सादर केली आहे.

भारतीय पारंपरिक चर्मकला कोल्हापुरी चपलांचा वारसा जगभर पोहोचवण्यासाठी जागतिक ब्रॅन्ड प्राडा आणि लिडकॉम (संत रोहिदास चर्मउद्योग यांच्यात नुकताच सामंजस्य करार झाला. या करारानुसार कारागिरांच्या कौशल्य विकासाला चालना देण्यासाठी प्राडा पुढील तीन वर्षांसाठी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (एनआयएफटी) आणि कर्नाटक इन्स्टिट्यूट ऑफ लेदर अँड फॅशन टेक्नॉलॉजी (केआयएलटी) येथे प्रशिक्षण कार्यक्रमासाठी संपूर्ण निधी उपलब्ध करून देणार आहे. या माध्यमातून महाराष्ट्र आणि कर्नाटकातील कोल्हापुरी चपला बनवणाऱ्या पारंपरिक लेदर कारागिरांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात येणार असून पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या या कारागिरीला आधुनिक डिझाइन आणि तांत्रिक



कौशल्यांची जोड देण्यावर या कार्यक्रमात भर देण्यात येणार आहे.

पारंपरिक कला जपणाऱ्या कारागिरांच्या पिढ्यांचा सन्मान करण्यासाठी आणि त्यांच्या कौशल्याला जागतिक पातळीवर योग्य ओळख देण्यासाठी ही भागीदारी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट म्हणाले, प्राडा सोबत हा करार केवळ कारागिरांच्या श्रमाला प्रतिष्ठा देणारा नाही, तर पिढ्यानढ्या जोपासलेल्या भारतीय सांस्कृतिक परंपरेचा गौरव आहे. एक जागतिक ब्रँड महाराष्ट्रातील कारागिरांसोबत काम करत असल्याने त्यांच्या या कौशल्याला एक ओळख मिळेल आणि कलेचे पूर्ण श्रेय या कारागिरांना मिळेल.

राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी या भागीदारीची संकल्पना, समन्वय आणि अंमलबजावणी लिडकॉमने प्रभावीपणे केली असल्याचे नमूद केले. विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी सांगितले की, आंतरराष्ट्रीय कायदे, जागतिक संबंध आणि बौद्धिक संपत्ती हक्कांचा विचार करून अत्यंत सूक्ष्म नियोजनातून हा करार करण्यात आला आहे. कारागिरांच्या पिढीजात हक्कांचे संरक्षण हेच आमचे प्रमुख ध्येय होते.

प्राडा पुढील तीन वर्षांसाठी महाराष्ट्र आणि कर्नाटकातील ३०० कोल्हापुरी कारागिरांना प्रशिक्षण देण्यासाठी पूर्ण निधी उपलब्ध करून देणार आहे. हे प्रशिक्षण नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (एनआयएफटी) आणि कर्नाटक इन्स्टिट्यूट ऑफ लेदर अँड फॅशन टेक्नॉलॉजी येथे दिले जाईल. त्यापैकी सर्वोत्तम ३० कारागिरांना इटलीतील प्राडा अकादमीमध्ये प्रगत प्रशिक्षणाची संधी मिळणार आहे.

या प्रशिक्षणामध्ये डिझाइन, तांत्रिक कौशल्ये, डिजिटल साधने आणि बाजारपेठेतील ट्रेंड्स यांचा समावेश असणार आहे. यामुळे पारंपरिक कौशल्य जपत कारागिरांना आधुनिक बाजारपेठेसाठी सक्षम बनविण्याचा उद्देश आहे. या उपक्रमामुळे शतकानुशतके जपल्या गेलेल्या कोल्हापुरी चप्पल परंपरेला आंतरराष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळाली आहे. यामध्ये लिडकॉम या संस्थेची महत्त्वपूर्ण भूमिका असून, गेल्या पाच दशकांपासून ही संस्था महाराष्ट्रातील चर्मकार आणि लेदर कारागिरांच्या सन्मान, उपजीविका आणि हक्कांच्या संरक्षणासाठी कार्यरत आहे. १ मे १९७४ रोजी सामाजिक न्याय विभागांतर्गत स्थापन झालेल्या लिडकॉमने पारंपरिक लेदर कारागिरीची ओळख जपण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. कोल्हापुरी चप्पलांना २००९ मध्ये भौगोलिक निर्देशांक (जीआय) दर्जा मिळवून देण्यात संस्थेचा मोठा वाटा आहे.

प्राडाच्या स्प्रिंग २०२६ मेन्सवेअर सादरीकरणानंतर या सहकार्याची प्रक्रिया सुरू झाली. त्यानंतर प्राडाच्या प्रतिनिधीमंडळाने कोल्हापूरला भेट देत कारागिरांशी संवाद साधला. या चर्चेनंतर मुंबईतील इटलीच्या वाणिज्य दूतावासात लिडकॉम आणि प्राडा यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

## चौकीदार भरती जाहिरात दुरुस्त करण्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके यांचे निर्देश

**मुंबई/वृत्तसंस्था**

आदिवासी विकास विभागाच्या नाशिक येथील आयुक्तालयाने २७ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या चौकीदार पदांच्या जाहिरातीत अनुसूचित जमाती (एसटी) संवर्गासाठी एकही पद राखीव नसल्याचे समोर आल्यानंतर आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी तातडीने हस्तक्षेप करत संबंधित अधिकाऱ्यांना जाहिरात दुरुस्तीचे निर्देश दिले.



मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी विभागाचे सचिव व आयुक्त यांच्यासोबत व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेतली. या बैठकीत २० नोव्हेंबर २०२५ च्या शासन निर्णयातील तरतुदींचा सखोल अभ्यास करून जाहिरात दुरुस्त करण्याचे आणि तत्काळ सुधारित जाहिरात प्रसिद्ध करण्याचे आदेश देण्यात आले. मंत्री डॉ. अशोक वुईके म्हणाले, चौकीदार पदांच्या भरतीसाठी शुद्धीपत्रक काढण्यात येणार असून, अनुसूचित जमाती उमेदवारांवर होणारा अन्याय दूर केला जाणार आहे. तसेच, अट्रॉसिटी कायद्यांतर्गत पीडितांच्या वारसदारांना शासकीय सेवेत संधी देण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आली आहे. आदिवासी विकास विभागातील वर्ग-४ मधील १५१ पदे पुनरुज्जीवित करून एकदाच विशेष बाब म्हणून या पदांवर नियुक्त्या केल्या जाणार आहेत. या सुधारित प्रक्रियेत अनुसूचित जमाती उमेदवारांसाठी पदे राखीव ठेवण्यात येणार आहेत. अनुसूचित जमाती उमेदवारांवर कोणताही अन्याय होऊ दिला जाणार नाही. त्यामुळे कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये," असे आवाहन मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी केले आहे.

## ट्रम्प यांचा दबाव सहन केला जाणार नाही: इराण

### अमेरिका इतर देशांवर निर्णय लादण्याच्या स्थितीत नाही

**तेल अवीव, वृत्तसंस्था :**

इराणने मंगळवारी म्हटले की, अमेरिका आता इतर देशांना काय करावे हे सांगण्याच्या स्थितीत नाही. इराणच्या संरक्षण मंत्रालयाचे प्रवक्ते, रझा तलाए-निक यांनी सांगितले की, ते ट्रम्प यांचा दबाव सहन करणार नाहीत. ते म्हणाले की, अमेरिकेने आपल्या अवास्तव मागण्या सोडून दिल्या पाहिजेत. हे विधान अशा वेळी आले आहे, जेव्हा अमेरिका होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्याच्या इराणच्या नवीन प्रस्तावावर विचार करत आहे.



सध्या अमेरिका, इराण आणि इस्रायल यांच्यात युद्धविराम लागू आहे, परंतु संघर्ष पूर्णपणे संपवण्यासाठीच्या वाटाघाटींमधून अद्याप कोणतेही ठोस परिणाम मिळालेले नाहीत. दरम्यान, इराणने पहिल्यांदाच होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यास सहमती दर्शवली आहे. इराणने अमेरिकेला सागरी नाकेबंदी उठवण्याचे आवाहनही केले आहे.

ट्रम्प यांनी दोन दिवसांत दुसऱ्यांदा इराणचा प्रस्ताव फेटाळला आहे. खरेतर, गेल्या अनेक आठवड्यांपासून इराण आणि अमेरिका यांच्यात पाकिस्तानमार्फत प्रस्तावांची देवाणघेवाण सुरू आहे, परंतु अणुकार्यक्रमाशी संबंधित महत्त्वाच्या मुद्द्यांवर अद्याप सहमती होऊ शकलेली नाही. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दावा केला आहे की, इराण कोसळण्याच्या मार्गावर आहे.

ट्रम्प यांनी एका सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे की, इराणने अमेरिकेला कळवले आहे की ते अत्यंत बिकट परिस्थितीत आहेत आणि त्यांना होर्मुझची सामुद्रधुनी लवकरात लवकर उघडायची आहे. इराण सध्या आपले नेतृत्व संकट सोडवण्याचा प्रयत्न करत आहे. संयुक्त अरब अमिरातीने (यूएई) 'ओपेक'मधून बाहेर पडल्याची घोषणा केली आहे. संयुक्त अरब अमिरातीचा हा निर्णय म्हणजे अरब राष्ट्रांसाठी मोठा धक्का मानला जात आहे. पण डोनाल्ड ट्रम्प यांच्यासाठी हा दिलासा मानला जात आहे.

## 'डिजिटल अरेस्ट'साठी वापरलेली ९,४०० व्हॉट्सॲप खाती बंद!

### ॲटर्नी जनरल आर. वेंकटरामणी यांची सर्वोच्च न्यायालयात माहिती; कंबोडियातून चालत होते रॅकेट

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

जानेवारी २०२६ पासून १२ आठवड्यांच्या कालावधीत भारतामध्ये 'डिजिटल अरेस्ट' घोटाळ्यांशी संबंधित ९,४०० हून अधिक खात्यांवर बंदी घालण्यात आली आहे. सरकारी यंत्रणांच्या समन्वयाने राबवण्यात आलेल्या एका विशेष मोहिमेचा हा भाग होता, असे व्हॉट्सॲपचे म्हणणे ॲटर्नी जनरल आर. वेंकटरामणी यांनी २८ एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयासमोर सादर केले. 'डिजिटल अरेस्ट' वाढत्या प्रकरणांनंतर सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेत सुनावणी सुरू केली आहे.

**केवळ तक्रार नव्हे, संपूर्ण जाळे नष्ट करण्यावर भर**

व्हॉट्सॲपने स्पष्ट केले की, ते केवळ वैयक्तिक तक्रारींवर कारवाई करत नाहीत. आम्ही भारत सरकारच्या यंत्रणांकडून मिळणाऱ्या माहितीला केवळ एक अहवाल मानत नाही, तर त्या माहितीचा वापर करून गुन्हेगारांचे संपूर्ण नेटवर्क शोधून ते नष्ट करतो. सरकारी यंत्रणांनी सुमारे ३,८०० संशयास्पद खात्यांची माहिती दिली होती, मात्र व्हॉट्सॲपने स्वतःच्या अंतर्गत तपास यंत्रणेद्वारे त्याहून कितीतरी अधिक खात्यांवर कारवाई केली.

आर. वेंकटरामणी यांनी न्यायालयास सांगितले की, व्हॉट्सॲपच्या तपासात या घोटाळ्यांच्या कार्यपद्धतीबद्दल महत्त्वाची माहिती समोर आली आहे. भारतीय युजरना लक्ष्य करणारी बहुतेक खाती आग्नेय आशियातील, विशेषतः कंबोडियातील स्कॅम सेंटर्समधून चालवली जात असल्याचे निष्पन्न झाले. हे फसवणूक करणारे दिल्ली पोलीस, मुंबई मुख्यालय, सीबीआय आणि एटीएस विभाग यांसारख्या नावांचा वापर करत होते. अधिकृत वाटावे यासाठी प्रोफाइल पिक्चर म्हणून सरकारी यंत्रणांचे लोगो वापरून दबाव निर्माण करत होते.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# 'कलमा पठण येतं का? तुझा धर्म काय?' विचारत मीरा रोडमध्ये तरुणाचा सुरक्षा रक्षकांवर हल्ला

**मुंबई/वृत्तसंस्था**

मुंबईतल्या मीरा रोड या उपनगरीय भागात अमेरिकेहून आलेल्या एका तरुणाने २७ एप्रिलच्या सकाळी दोन सुरक्षा रक्षकांवर चाकू हल्ला केला. त्याआधी त्याने या दोन्ही सुरक्षा रक्षकांना त्यांचा धर्म आणि नाव विचारलं होतं. तसंच हेदेखील विचारलं होतं की तुम्हाला कलमा पढता येतो का? या तरुणाचं आडनाव अन्सारी आहे अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. हा दहशतवादी हल्ल्याचा कट तर नाही ना? असा संशय पोलिसांना आहे त्यामुळे या प्रकरणाची चौकशी ATS कडे देण्यात आली आहे.

मीरा रोड येथील नया नगर भागात वोक्हार्ट रुग्णालय आहे. त्या रुग्णालयाच्या मागे एका इमारतीचं बांधकाम सुरु आहे. २७ एप्रिलच्या पहाटे साधारण ४ च्या सुमारास अन्सारी आडनाव असलेला युवक या ठिकाणी पोहचला. त्याने सुरक्षा रक्षक राजकुमार मिश्रा याच्याशी क्षुल्लक कारणावरुन हुज्जत घातली. त्यानंतर अचानक चाकू काढला आणि त्याच्यावर हल्ला केला. ज्यानंतर सुब्रतो सेन हा सुरक्षा रक्षक बचावासाठी धावला तेव्हा अन्सारी आडनावाच्या तरुणाने त्याच्यावरही हल्ला केला. या घटनेनंतर तिथून त्याने पळ काढला. राजकुमार मिश्रा यांची प्रकृती गंभीर



आहे. अन्सारीने तुला कलमा वाचता येतो का? नमाज पठण येतं का असं विचारून सुरक्षा रक्षकावर हल्ला केला होता. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेताच त्याच्याकडे ISIS, जिहाद अशी लिहिलेली नोटसुद्धा आढळली. या प्रकरणाचा तपास एटीएसकडे सोपवण्यात आला आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार आरोपीने सुरुवातीला दोन्ही सुरक्षा रक्षकांना रस्ता विचारला. त्यानंतर तो गेला, थोड्या वेळाने परत येत या दोघांना त्यांचा धर्म विचारला आणि नावंही विचारली. कलमा पठण करता येत नाही म्हटल्यावर हल्ला केला. सध्या जखमी सुरक्षा रक्षकावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

## ISIS शी संबंधित प्रपोगंडा व्हिडीओ बघत होता तरुण

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार अन्सारी हा तरुण सोशल मीडियावर ISIS शी संबंधित प्रपोगंडा व्हिडीओज वारंवार बघत होता. तसंच सोशल मीडियावरही त्याने काही पोस्ट लिहिल्या आहेत. या तरुणाने धर्म विचारुन जो हल्ला केला त्यामागे त्याचा हेतू काय? याचा तपास आता पोलीस आणि महाराष्ट्र एटीएस यांच्याकडून घेतला जातो आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार अन्सारी हा २०१९ पर्यंत मध्ये अमेरिकेत होता. तिथे त्याने त्याचं शिक्षण पूर्ण केलं. त्यानंतर तो भारतात परतला होता. मागील काही वर्षांपासून हा तरुण मीरा रोड या भागात एकटा राहात होता. हल्ला केल्यानंतर पुढील दीड तासात पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजचा आधार घेऊन या तरुणाला अटक केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी अन्सारी एका कोचिंग क्लासमध्ये शिकवत होता. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे त्याला अटक केली आहे. तसंच या तरुणाने काही महिन्यांपूर्वी कोचिंगचं हे काम सोडलं होतं. ५ मे रोजी त्याने त्याचं मीरा रोड येथील घर रिकामं करावं असं त्याच्या घरमालकाने त्याला सांगितलं होतं अशीही माहिती समोर आली आहे. पोलिसांना आरोपीच्या घरी काही नोट्स मिळाल्या आहेत. ISIS जाण्याची इच्छा त्याने व्यक्त केल्याची माहिती समोर आली आहे. विज्ञान विषयात त्याने पदवी घेतली आहे. २०१० ते २०१९ अशी नऊ वर्षे अन्सारी नावाचा हा तरुण अमेरिकेत होता. अमेरिकेत त्याला नोकरी मिळाली नाही त्यामुळे तो भारतात परतला. दरम्यान या प्रकरणाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रतिक्रिया दिली आहे.

सेल्फ रॅडिकलायजेशनचं हे प्रकरण आहे. इंटरनेट, पुस्तकं या माध्यमातून हा आरोपी तयार झालेला दिसतो आहे. याला आपल्याला केवळ जिहाद करायचा आहे, म्हणजेच इतर धर्मीयांना मारायचं आहे या मानसिकतेतून त्याने हे कृत्य केलं आहे. याचं कुटुंब परदेशात आहे, हा आरोपीही परदेशात राहिला आहे. आधी तो कुर्ला या ठिकाणी आणि नया नगरला तो राहायला आला. या सगळ्या मागे कोण आहे याचा तपास आता पोलीस करत आहेत.

# अल्यूमिनियम धातूची चोरी करणारी टोळी जेरबंद; रसायनी पोलीसांची कारवाई



**अलिबाग/वृत्तसंस्था**

रसायनी येथील हिरानंदानी फॉरच्युन सिटी येथून दोन टन वजनाच्या अल्यूमिनीयम धातूच्या सेंटरींग प्लेट चोरीला गेल्या होत्या. या प्रकरणी रसायनी पोलीसा ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. पोलीसांनी २४ तासात तपास करून आरोपी टोळी जेरबंद केली आहे. रसायनी येथील हिरानंदानी फॉरच्यून सिटी येथून २५ एप्रिल २०२६ पहाटे तीनच्या सुमारास दहा ते बारा जणांनी २ टन वजनाच्या अँल्यूमिनीयम धातूच्या साडे सहा लाख रुपये किमतीच्या सेंटरीग प्लेट चोरीला गेल्या होत्या. या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेची दखल घेऊन रसायनी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी अभिजीत भुजबळ आणि त्यांचे सहकारी घटनास्थळी दाखल झाले त्यांनी तपास सुरू केला. मुंबई पुणे जुने महामार्गावरील घटनास्थळाचे दोन्ही बाजुकडील सीसीटीव्ही फुटेज पडताळणी केली त्यात संशयीत टेम्पो दिसून आला. त्यानंतर शेडुंग टोल नाका येथे सदर टेम्पोचे सीसीटीव्ही फुटेज पडताळणी केले असता त्या ठिकाणी टेम्पोची नंबर प्लेट दिसु नये या पद्धतीने काळी केलेली असल्याचे दिसून आले. टोल नाक्याचे सिस्टीममध्ये दिलेला नंबर देखील चुकीचा दाखवित होता. त्यामुळे तपास अत्यंत क्लिष्ट व गुंतागुतीचा होत होता.

सीसीटीव्ही चे तांत्रीक विश्लेषण व गोपनिय बातमीदार यांचा वापर करून गुन्ह्यात वापरलेल्या टेम्पोचा शोध घेतला असता सदरचा टेम्पो सीबीडी बेलापुर येथील असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर सीबीडी बेलापुर रेल्वे स्टेशन परिसरामध्ये सापळा रचुन शिताफीने टेम्पो व त्यावरील टेम्पोचा चालक यास ताब्यात घेतले. त्यानंतर त्याच्या साथीदारांना ताब्यात घेण्यात आले. चोरीला गेलेला सर्व साडे मुद्देमल पोलीसांनी जप्त केला आहे. विकास रामपाल वाल्मिकी वय. 26 वर्षे, रा. सीबीडी बेलापुर, आताउल्ला उर्फ यासीन अमजलअली खान, वय. 25 वर्षे, रा. पळस्पे पनवेल अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. अन्य तीन आरोपींही निष्पन्न झाले आहेत.त्यांचा शोध सुरू आहे. गुन्ह्यात वापरलेली वाहनेही पोलीसांनी जप्त केली आहेत. पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ, सहा. पोलीस निरीक्षक प्रमोद जाधव, उप निरीक्षक मंगेश बाचकर, सहा. फौजदार. लालासाहेब कोळेकर, पोलीस हवालदार नितीन शेडगे, पोलीस शिपाई वैभव होले, गिरीष नगरकर, रविंद्र कुंभार, पोलीस हवालदार हेमंत कोकाटे, सुशांक पिंगळे, सचिन चौरे, हरिश्चंद्र मेहत्रे यांनी तपासात महत्वाची भूमिका बजावली.

# राजा रघुवंशी हत्याकांडातील मुख्य आरोपी सोनम रघुवंशीला न्यायालयाकडून जामीन

**इंदूर/वृत्तसंस्था**

राजा रघुवंशीच्या हत्याकांड प्रकरणात मुख्य आरोपी सोनम रघुवंशीला म्हणजेच त्याच्या पत्नीला जामीन मिळाला आहे. इंदूर या ठिकाणी राहणारं हे जोडपं होतं. हे दोघंही त्यांच्या लग्नानंतर आधी कामाख्या देवीच्या दर्शनासाठी गुवाहाटीला गेले होते. त्यानंतर गुवाहाटीवरुन ते दोघंही शिलाँगला गेले. सुरुवातीला राजा आणि सोनम दोघंही बेपत्ता झाल्याची बातमी समोर आली होती. मात्र नंतर राजाचा मृतदेह खोल दरीत सापडला आणि सोनमच्या प्रियकराला आणि त्याच्या साथीदारांना या प्रकरणात अटक झाल्यानंतर सोनमही समोर आली. या प्रकरणात सोनम मुख्य आरोपी आहे. पती राजा रघुवंशीची हत्या घडवून आणणे, हत्येचा कट रचणे असे गंभीर गुन्हे तिच्यावर होते. आता याच सोनम रघुवंशीला जामीन मंजूर झाला आहे.

सोनमला जामीन मिळाला असल्याची माहिती तिच्या कुटुंबीयांनी दिली आहे. तसंच राजा रघुवंशी यांच्या मोठ्या भावानेही हे वृत्त दिलं आहे. न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे आम्ही निराश आहोत असंही त्यांनी म्हटलं आहे. दरम्यान पीटीआय या वृत्तसंस्थेने सोनम रघुवंशीला जामीन मिळाल्याचं वृत्त दिलं आहे.

२३ मे रोजी राजा आणि सोनम हे दोघंही शिपारा होम स्टे या ठिकाणी आले. पहाटे ५ वाजून ३० मिनिटांनी या दोघांनी चेक इन केलं. त्यानंतर सहा वाजण्याच्या सुमारास राजा आणि सोनम हे दोघंही ट्रेकला जाण्यासाठी तयार झाले. याचवेळी सोनमने ज्या तिघांना राजाच्या हत्येची सुपारी दिली होती ते तिघेही जवळच्या एका होम स्टेमध्ये राहिले होते. साधारण १० वाजण्याच्या सुमारास सोनम आणि राजाने ट्रेक करत असताना २ हजार पायऱ्यांचं अंतर पार केलं. त्याआधी त्यांची भेट आनंद, आकाश आणि विशाल यांच्याशी झाली होती. साधारण



१० वाजण्याच्या सुमारास राजा, सोनम, आकाश, विशाल आणि आनंद या पाचही जणांना अल्बर्ट या टुरिस्ट गाईडने पाहिलं होतं. अल्बर्टने दिलेल्या जबाबामुळेच सोनमच यामागे असावी हे पोलिसांच्या लक्षात आलं आणि त्या अनुषंगाने त्यांनी तपासाची चक्रं फिरवली. या टुरिस्ट गाईडने दिलेल्या माहितीनुसार सोनम या चार जणांच्या मागून चालत होती तर तिच्या चालण्याचा वेग थोडा मंदावला होता.

२३ मे २०२५ च्या दुपारी १२.३० च्या दरम्यान सोनमने राजाची आई उमा रघुवंशी यांना फोन केला. मी खूपच दमले आहे आणि उपास ठेवला आहे असं तिने सासूला म्हणजेच राजाच्या आईला सांगितलं. त्यावेळी उमा रघुवंशी राजाशीही बोलल्या. राजाशी हा आपला शेवटचा संवाद आहे हे तेव्हा त्यांना मुळीच वाटलं नव्हतं. साधारण आणखी अर्ध्या तासाने दुपारी १ ते १.३० च्या सुमारास हे पाचही जण मावलखियाट या ठिकाणाहून वेई सावदोंग धबधब्याच्या दिशेने निघाला. त्यावेळी सोनलने या तिघांना इशारा केला ज्यानंतर राजाच्या डोक्यावर चाकू हल्ला करण्यात आला. राजाची हत्या करण्यात आली तेव्हा सोनम तिथेच उपस्थित होती. राजाच्या हत्येनंतर सोनमने राजाच्या मोबाइलवरुन सात जन्मो का साथ असं लिहून एक सोशल मीडिया पोस्ट केली. दुपारी २.३० च्या दरम्यान राजाचा मृतदेह दरीत फेकण्यात आला. असा घटनाक्रम राजाच्या मृत्यू आधी घडला होता.

इस्ट खासी हिल्सचे पोलीस अधीक्षक विवेक सैय्याम यांनी दिलेल्या माहितीनुसार २३ मे २०२५ रोजी राजा रघुवंशीची सोनम आणि तिचा प्रियकर राज कुशवाहा यांनी सुपारी किलर्सकडून हत्या घडवून आणली. राजाचा मृतदेह २ जून २०२५ रोजी पोलिसांना आढळून आला. मात्र सोनम रघुवंशी तरीही बेपत्ता होती. सुरुवातीला पोलिसांना हे लूट आणि अपहरण याचं प्रकरण वाटलं होतं.

मात्र पोलिसांनी जेव्हा सोनम रघुवंशीचे फोन रेकॉर्ड तपासले तेव्हा राज कुशवाहाशी ती सातत्याने संपर्कात होती हे कळलं. पोलिसांनी राज कुशवाहाला अटक केली. त्यानंतर ८ जून रोजी सोनम पोलिसांना शरण आली होती. तिला त्यानंतर अटक करण्यात आली. मात्र आज शिलाँग येथील न्यायालयाने सोनमला जामीन मंजूर केला आहे.

# पंजाबला पहिल्यांदाच पराभवाचा धक्का, फरेरा-शुभमने राजस्थानला दिलं जिंकून

■ मुंबई, वृत्तसंस्था :

राजस्थान रॉयल्सने पंजाब किंग्सला घरच्या मैदानावर पराभवाचं पाणी पाजत संघाचा विजयीरथ रोखला. पंजाब किंग्सने या सामन्यासह यंदाच्या स्पर्धेतील पहिला सामना ६ विकेट्सने गमावला आहे. राजस्थानकडून शुभम दुबे व डोनावन फरेरा यांनी ७७ धावांची खेळी केली आणि संघाचा विजय निश्चित केला. तर पंजाब किंग्सकडून मार्कस स्टॉयनिसने ६६ धावांची उत्कृष्ट खेळी करत संघाला मोठी धावसंख्या उभारून दिली होती.



पंजाबने दिलेल्या २२२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थानने दणदणीत सुरूवात केली. वैभव सूर्यवंशीने पहिल्या षटकात षटकार मारत संघाच्या वेगवान रन चेसला सुरूवात केली. वैभव सूर्यवंशी १६ चेंडूत ३ चौकार व ५ षटकारांसह ४३ धावांची खेळी केली. तर यशस्वी जैस्वालने २७ चेंडूत अर्धशतकी खेळी केली. यानंतर ध्रुव जुरेल १६ धावा तर रियान पराग २९ धावा करत माघारी परतले. यानंतर डोनावर फरेरा आणि शुभम दुबे यांनी संघाला विजय मिळवून दिला. डोनावन फरेराने २६ चेंडूत ६ चौकार व ३ षटकारांसह ५२ धावांची खेळी केली. तर शुभम दुबेने १२ चेंडूत ३ चौकार व २ षटकारांसह ३१ धावांची खेळी केली. या दोघांच्या ७७ धावांच्या भागीदारीमुळे १९.२ षटकांत २२८ धावा करत संघाचा विजय निश्चित केला.

राजस्थानने नाणेफेक जिंकत पंजाब किंग्सला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण करण्यात आलं. प्रभसिमरन सिंग व प्रियांश आर्य यांनी संघाला चांगली सुरूवात करून दिली. प्रियांश आर्य २९ धावा करत बाद झाला. तर प्रभसिमरन सिंगने ४४ चेंडूत ६ चौकार व एका षटकारासह५९ धावांची खेळी कली. तर कुपर कॉनोली व श्रेयस अय्यर दोघांनी प्रत्येकी ३०-३० धावांचं योगदान दिलं. तर मार्कस स्टॉयनिसने अखेरच्या षटकांमध्ये वादळी फटकेबाजी केली आणि संघाला २०० धावांच्या पलीकडे नेलं.

मार्कस स्टॉयनिसने २२ चेंडूत ४ चौकार व ६ षटकारांसह २८१च्या स्ट्राईक रेटने ६२ धावांची खेळी केली. स्टॉयनिसच्या या फटकेबाजीसह पंजाब किंग्सने २० षटकांत ४ बाद २२२ धावांची खेळी केली. राजस्थानकडून यश राज पुंजा या नव्या खेळाडूने २ विकेट्स घेतल्या. तर आर्चर, बर्गर यांनी १-१ विकेट्स घेतल्या.

राजस्थान रॉयल्स संघात परत येण्यात श्रीलंकेचे माजी कर्णधार आणि प्रशिक्षक कुमार संगकारा यांचा मोलाचा वाटा आहे. संगकारा यांच्या पुढाकारामुळेच फरेरा रॉयल्स संघात परतला आहे असं नेव्हस यांनी सांगितलं. आयपीएल कंत्राट मिळाल्यानंतर मायदेशात एका गरजू खेळाडूला फरेराने क्रिकेटचं किट उपलब्ध करून दिलं होतं.

## भारतीय महिला संघाच्या पदरात परभव; 4-1ने मालिका दक्षिण आफ्रिकेच्या खिशात

■ बेनोनी/वृत्तसंस्था

भारतीय महिला क्रिकेट संघ आणि दक्षिण आफ्रिका महिला संघात ५ सामन्यांची मालिका पार पडली. भारतीय महिला क्रिकेट संघाचे नेतृत्व हरमनप्रीत कौर करत होती. तर दक्षिण आफ्रिकेच्या संघाचे नेतृत्व लॉरा वॉल्व्हाईट करत होती. भारतीय महिला क्रिकेट संघासाठी दक्षिण आफ्रिका दौरा अत्यंत निराशाजनक ठरला आहे. ५ सामन्यांच्या मालिकेत साऊथ आफ्रिकेने ४ सामने जिंकले. शेवटच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने भारताचा २३ रन्सने पराभव केला.

शेवटच्या सामन्यात टॉस जिंकून पहिल्यांदा प्रथम फलंदाजी करणाऱ्या दक्षिण आफ्रिकेच्या संघाने २० ओव्हर्समध्ये १५५ रन्स केले. आफ्रिकेची कर्णधार लॉरा वॉल्व्हार्डने ५६ बॉलमध्ये ९२ रन्सची दमदार खेळी केली. तिच्या या कामगिरीमुळेच दक्षिण आफ्रिकेला १५० रन्सचा टप्पा पूर्ण करता आला. भारतीय संघाला १५६ रन्सचा पाठलाग करताना दमछाक झाली. भारतीय संघाची सुरुवात अत्यंत निराशाजनक अशा स्वरूपात झाली. या सामन्यात स्मृती मंधाना जी जबरदस्त फॉर्ममध्ये होती तिने या सामन्यात निराशा केली.



ती लवकर आउट झाल्यामुळे भारतीय संघाला फटका बसला. त्यापाठोपाठ शेफाली वर्मा आणि जेमिमा रॉड्रिग्स अनुक्रमे ४ आणि १ रन करून आउट झाल्या. कर्णधार हरमनप्रीत कौरने २२ रन्स केले. मात्र त्या खेळीचे रूपांतर ती मोठ्या खेळीत करू शकली नाही. भारती फुलमाळीने ३० चेंडूंत ४० रन्सची झुंजार खेळी करत भारताच्या आशा जिवंत ठेवल्या. मात्र ती आउट झाल्यावर भारताचा पराभव निश्चित झाला. रिचा घोषने अखेरच्या षटकांत नाबाद २५ धावा केल्या. पण तोपर्यंत सामना भारताच्या हातून निसटला होता. भारताचा डाव १३२ रन्सवर मर्यादित राहिला.

## पीएसएल प्ले-ऑफमध्ये चाहत्यांना प्रवेश

■ लाहोर/वृत्तसंस्था

पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी पाकिस्तान सुपर लीग २०२६ च्या अंतिम टप्प्यांसाठी स्टेडियममध्ये प्रेक्षकांना येण्याची परवानगी दिली आहे. आता चाहते तीन प्ले-ऑफ सामन्यांचा आणि अंतिम सामन्याचा आनंद घेऊ शकतील. इराण युद्धामुळे इंधनाच्या किमती वाढत होत्या, त्यामुळे सरकारने जनतेला घरात राहण्याचे आणि कमी प्रवास करण्याचे आवाहन केले होते. याच मोहिमेत पीसीबीने प्रेक्षकांना स्टेडियममध्ये येण्यावर बंदी घातली होती जेणेकरून गाड्यांचा वापर कमी होईल.

फ्रँचायझी मालकांच्या मागणीनुसार आता संपूर्ण प्ले-ऑफ फेरीसाठी मंजुरी देण्यात आली आहे. या वर्षी पाकिस्तानची ही सर्वात मोठी क्रीडा स्पर्धा गेल्या महिन्यात 'बंद दारांमागे' सुरू झाली होती. पाकिस्तान क्रिकेट बोर्डचे अध्यक्ष मोहसिन नकवी, जे अंतर्गत व्यवहार मंत्री देखील आहेत, त्यांनी इस्लामाबादमध्ये पंतप्रधान शरीफ यांची भेट घेतल्यानंतर ही माहिती दिली. नकवी यांनी एक्सवर सांगितले



की, पंतप्रधानांना चाहते सामने पाहण्यासाठी यावेत असे वाटते, परंतु राष्ट्रीय बचत अभियानांतर्गत सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा किंवा इंधनाचा वापर कमी ठेवावा.

हि स्पर्धा आधी ६ शहरांमध्ये होणार होती, ती कमी करून लाहोर आणि कराचीपुरती मर्यादित करण्यात आली. सरकारचा युक्तिवाद होता की, जेव्हा जनतेला घरून काम करण्यास आणि वीज-इंधन वाचवण्यास सांगितले जात आहे, तेव्हा दररोज ३० हजार लोकांनी स्टेडियममध्ये पोहोचणे योग्य ठरणार नाही. आता परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर निर्बंध हटवण्यात आले आहेत.

## थॉमस कप : पुरुष संघ उपांत्यपूर्व फेरीत आज चीनशी लढणार

### महिला संघाचे 'उबेर कप २०२६' मधील आव्हान संपुष्टात

■ हैदराबाद/वृत्तसंस्था

हॉर्सन्स (डेन्मार्क) भारतीय पुरुष बॅडमिंटन संघाने थॉमस कप २०२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी सुरू ठेवत क्वार्टर फायनलमध्ये स्थान मिळवले आहे. तर, महिलांची उबर कप मोहीम सोमवार, २७ एप्रिल रोजी संपुष्टात आली. भारतीय पुरुष संघाने ऑस्ट्रेलियाला ५-० ने हरवले. सोमवारी डेन्मार्कच्या होर्सन्स येथे ग्रुप-ए च्या दुसऱ्या सामन्यात भारतीय पुरुष संघाने ऑस्ट्रेलियाला ५-० ने क्लीन स्वीप केले. यापूर्वी भारताने पहिल्या सामन्यात कॅनडाला ४-१ ने हरवले होते. आता बुधवारी भारताचा सामना टॉप सीड चीनशी होईल, ज्यामुळे ग्रुप-ए मधील अव्वल संघ निश्चित होईल.



लक्ष्य सेन आणि आयुष शेट्टी यांनी सुरुवातीची आघाडी मिळवून दिली. सामन्याची सुरुवात लक्ष्य सेनने केली. पॅरिस ऑलिम्पिक सेमीफायनलिस्ट लक्ष्यने एप्रैम स्टीफन सॅमला २१-१४, २१-१६ ने हरवून भारताचे खाते उघडले. दुसऱ्या सिंगल्समध्ये आशियाई चॅम्पियनशिप रौप्यपदक विजेता आयुष शेट्टीने श्रेय ढांढला २६ मिनिटांत २१-८, २१-६ ने हरवून स्कोअर २-० केला.

तर भारतीय महिला संघाचा उबर कपमधील प्रवास संपला आहे. गट-अ च्या शेवटच्या सामन्यात विद्यमान विजेता चीनने भारताला ५-० ने हरवले. सामन्याची सुरुवात पीव्ही सिंधू आणि वांग झी यी यांच्यातील अटीतटीच्या लढतीने झाली. पहिल्या गेममध्ये सिंधू १८-१२ ने आघाडीवर होती, पण वांगने पुनरागमन करत सामना जिंकला.

यानंतर, जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या चेन यू फीने इशारानी बरुआहला सरळ गेममध्ये हरवून चीनची आघाडी मजबूत केली आणि विजय जवळपास निश्चित केला. दुहेरीच्या सामन्यांमध्येही चीनचे वर्चस्व राहिले. लियू-तान आणि लुओ-झांग या जोड्यांनी आपले सामने जिंकून क्लीन स्वीप मिळवला. भारत गट फेरीत ३ सामन्यांमध्ये १ विजय आणि २ पराभवांसह स्पर्धेतून बाहेर पडला. भारताने २०१४ आणि २०१६ मध्ये कांस्यपदक जिंकले होते.

भारताची स्टार डबल्स जोडी सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टीने तिसरा सामना जिंकून अजिंक्य आघाडी घेतली. एशियन गेम्स सुवर्णपदक विजेत्या जोडीने रिझकी हिदायत आणि जॅक यूचा २१-१४, २१-१६ असा पराभव केला. या विजयामुळे भारताचे उपांत्यपूर्व फेरीत पोहोचणे निश्चित झाले. या सामन्यासाठी भारतीय संघात एक बदल करण्यात आला होता. किदांबी श्रीकांतच्या जागी कांस्यपदक विजेता एचएस प्रणयला संधी मिळाली. प्रणयने आपल्या पहिल्या सामन्यात ऋषी होंडा भूपतीला २१-११, २१-१७ ने हरवून भारताला ४-० ने आघाडी मिळवून दिली. शेवटच्या डबल्समध्ये हरिहरन अमशकरुनन आणि एमआर अर्जुनने एंडिका रामादियानस्याह आणि एप्रैम सॅमला २१-१२, २१-१० ने हरवून क्लीन स्वीप पूर्ण केला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



### राजश्री देशपांडे यांच्या 'शैलजा ते शैलेश' प्रवासासह प्रेम, मैत्री आणि संघर्षाची मांडणी

# बाप्या : नात्यांच्या गुंत्यात अडकलेली भावनिक कथा येतेय प्रेक्षकांच्या भेटीला; ट्रेलर रिलीज

नात्यांचा गुंता, प्रेमाची ओढ आणि मैत्रीची भन्नाट केमिस्ट्री एका वेगळ्या अंदाजात मांडणारा 'बाप्या' हा मराठी चित्रपट सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. पोस्टर आणि गाण्यांमुळे आधीच प्रेक्षकांच्या नजरेत आलेल्या या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला असून, त्याने प्रेक्षकांची उत्सुकता अधिकच वाढवली आहे. ट्रेलरमध्ये कथानकाची एक झलक पाहायला मिळते आणि ही कथा नेहमीसारखी सरळ नसून नात्यांच्या गुंतागुंतीतून पुढे सरकणारी आहे, हे स्पष्ट होते. चित्रपटात राजश्री देशपांडे साकारत असलेली 'बाप्या' ही व्यक्तिरेखा कथानकाच्या केंद्रस्थानी आहे.

'शैलजा ते शैलेश' असा तिचा प्रवास ट्रेलरमध्ये प्रभावीपणे दाखवण्यात आला आहे. या बदलामुळे तिच्या




वैयक्तिक आयुष्यात आणि नात्यांमध्ये मोठी उलथापालथ होते. तिचे लग्न गिरीश कुलकर्णी यांच्या पात्राशी झालेले असते आणि त्यांना एक मुलगाही असतो. मात्र, गिरीशच्या आयुष्यातील दुसरा पैलू समोर येताच कथेला वेगळेच वळण मिळते आणि इथूनच नात्यांमधील ताण, संघर्ष आणि गोंधळ वाढताना दिसतो.

ट्रेलरमध्ये "आपली यारी... गावावर भारी!" ही ओळ विशेष लक्ष वेधून घेते. या ओळीतून मैत्रीचा महत्त्वाचा धागा संपूर्ण कथेला जोडून ठेवतो, असे जाणवते. नात्यांमध्ये निर्माण होणाऱ्या गुंतागुंतीत मैत्री कशी आधार देते आणि प्रत्येक पात्राच्या आयुष्यात काय बदल घडवते, याची उत्सुकता ट्रेलरमुळे निर्माण होते. हलक्याफुलक्या प्रसंगांसोबतच भावनिक क्षणांचीही सुंदर सांगड घालण्यात आली असून, प्रेक्षकांना एक वेगळा अनुभव देण्याचा प्रयत्न यातून दिसून येतो.

या चित्रपटात देविका दफ्तरदार, श्रीकांत यादव आणि आर्यन मेंगजी यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. त्यांच्या अभिनयाची झलक ट्रेलरमध्ये प्रभावीपणे दिसते आणि कथेला अधिक वजन मिळते. वर्किंग आय फिल्म्स प्रस्तुत या चित्रपटाचे दिग्दर्शन समीर तिवारी यांनी केले आहे, तर मुत्कल तेलंग आणि समीर तिवारी यांनी निर्मितीची जबाबदारी सांभाळली आहे.


दिग्दर्शक समीर तिवारी यांनी 'बाप्या'बद्दल बोलताना सांगितले की, ही कथा नात्यांभोवती फिरणारी असली तरी ती सरळसोट नाही. प्रत्येक नात्यामध्ये असलेली गुंतागुंत आणि त्यातून निर्माण होणारे प्रश्न त्यांनी या चित्रपटातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## अभिनेत्री प्रीत सिंहला मुंबईतील क्लबमध्ये मारहाण

मुंबईत अभिनेत्रीसोबत धक्कादायक घटना घडली आहे. रिॲलिटी शो 'स्प्लिट्सविला सीझन १६'ची स्पर्धक अभिनेत्री प्रीत सिंहने तिच्या सोशल मीडियावर शेअर केलेल्या एका व्हिडीओमध्ये तिची अवस्था न पाहण्यासारखी आहे. अभिनेत्री प्रीत सिंहला रात्रीच्या सुमारास एका व्यक्तीने गंभीररित्या मारहाण केली आहे. ती एका क्लबमध्ये गेलेली असताना तिला तिथे बेदम मारहाण करण्यात आली. या मारहाणीत तिच्या चेहऱ्यावर गंभीर दुखापत झाल्याचे दिसून येत आहे. ज्यात तिचे दात तुटले, संपूर्ण चेहरा आणि डोळे गंभीररित्या सुजल्याचे पाहायला मिळते.

तिने स्वतःच्या सोशल मीडियावर पोस्ट करत म्हटले की, "मी नेहमीच ऐकले होते की मुंबई मुलींसाठी सर्वात सुरक्षित शहरांपैकी एक आहे, पण ते माझे असे स्वागत करेल याची मी कधी कल्पनाही केली नव्हती. हे लिहित असतानाही, मी थरथरत आहे, माझे डोळे सुजले आहेत, माझ्या चेहऱ्यावर जखमा झाल्या आहेत आणि जे घडले ते मी अजूनही पचवण्याचा प्रयत्न करत आहे.

पुढे तिने सांगितले, "मी माझ्या मैत्रिणीसोबत एका क्लबमध्ये आरामात बसून मजा करत



होते, तेव्हा एक मुलगी अचानक ओरडायला लागली आणि आम्हाला आत येऊच कसे दिले, असा प्रश्न विचारू लागली आणि तिच्या पुरुष मित्राने मध्ये येऊन आमच्यावर शारीरिक हल्ला केला. मला इतका मार लागला की माझा दात तुटला आणि माझा चेहरा सुजला. लोकांनी हस्तक्षेप केल्यावरच परिस्थिती थांबली. नंतर मला समजले की, ती मुलगी एक तथाकथित इन्फ्लुएन्सर आहे. असे काही इतक्या उघडपणे घडू शकते या विचाराने मी अजूनही हादरले आहे. कोणासोबतही असे व्हायला नको." तिचे मॉडेलिंग आणि अभिनय क्षेत्रात देखील वर्चस्व आहे. सध्या अभिनेत्रीचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून घडलेल्या घटनेवर अनेकांनी संताप देखील व्यक्त केला आहे.

## गरोदरपणातही शूटिंग सुरू ठेवणार दीपिका

दीपिका पादुकोण तिच्या दुसऱ्या गरोदरपणामुळे बरीच चर्चेत असताना आता तिच्या चित्रपटाची माहिती समोर आली आहे. टीमने आधीच स्पष्ट केले होते की 'राका' चित्रपटात दीपिका अत्यंत महत्त्वाची भूमिका साकारणार आहे आणि आपल्या गरोदरपणाच्या काळातही शूटिंग सुरू ठेवणार आहे. आता नव्या माहितीनुसार हे अधिक स्पष्ट झाले आहे की दीपिका या चित्रपटात एक महत्त्वाचा भाग आहे आणि तिचे ॲक्शनसोबतच भावनिक सीनही पाहायला मिळणार आहेत. दीपिका या कथानकाची मुख्य कडी आहे आणि तिच्या सीनमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. चित्रपटात दीपिका पादुकोणची एंट्री धमाकेदार आहे आणि अल्लू अर्जुन सोबत तिचा एक मोठा ॲक्शन सीनही आहे. हे सीन बॉडी डबलच्या मदतीने शूट केले जातील, तर दीपिका पादुकोण स्वतः ड्रामॅटिक आणि भावनिक सीनचे शूटिंग सुरू ठेवेल. तिच्या भूमिकेत कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत. ॲटली यांच्या दिग्दर्शनाखाली तयार होत असलेल्या 'राका'बद्दल प्रचंड चर्चा आहे, विशेषतः दीपिका पादुकोणच्या भूमिकेबद्दल, ज्यामुळे कथेला भावनिक खोली मिळण्याची अपेक्षा आहे.

## दिलजीत दोसांझच्या कॉन्सर्टमध्ये राडा; धक्काबुक्की करत खलिस्तानची घोषणाबाजी

बॉलिवूडचा प्रसिद्ध अभिनेता आणि गायक दिलजीत दोसांझ सध्या कॅनडामध्ये असून तिथे त्याच्या लाईव्ह कॉन्सर्ट आयोजन सुरु आहे. पण या लाईव्ह कॉन्सर्टच्या वेळी एक धक्कादायक घडना घडली आहे. दिलजीतचा 'Aura-2026' (ऑरा-२०२६) हा कॉन्सर्ट सुरु असताना काही खलिस्तानी समर्थकांनी आंदोलन करायला सुरुवात केली. त्यामुळे कॉन्सर्टमध्ये गोंधळ निर्माण झाला होता.

हा कॉन्सर्ट सुरू असताना काही लोकांनी खलिस्तानचे झेंडे फडकवत जोरदार घोषणाबाजी केली. या वेळी त्यांनी भारतविरोधी घोषणा देत दिलजीत दोसांझ याच्यावरही गंभीर आरोप केले. काही आंदोलकांनी दिलजीत दोसांझ भाजप-आरएसएसचा एजंट असल्याचे म्हणत गायकावर निशाणा साधला.

गोंधळ वाढताच सुरक्षा कर्मचाऱ्यांनी हस्तक्षेप केला. आंदोलकांना थांबवण्याचा प्रयत्न करताना त्यांच्यात आणि सुरक्षा रक्षकांमध्ये धक्काबुक्कीही झाली. काही काळासाठी कार्यक्रमात अडथळा निर्माण झाला होता.

कॉन्सर्टमध्ये घोषणाबाजी करणाऱ्यांमध्ये पवनदीप सिंग बासी आणि मनदीप सिंग



रवी या दोन व्यक्तींचा समावेश होता. या दोघांचाही संबंध दहशतवादी गुरपतवंत सिंग पन्नू याच्या 'सिख्स फॉर जस्टिस' (SFJ) या संघटनेशी असल्याचे वृत्त आहे. ही पहिलीच वेळ नाही की दिलजीत दोसांझ यांना अशा प्रकारच्या विरोधाचा सामना करावा लागला आहे. याआधीही विविध देशांतील त्यांच्या कार्यक्रमांमध्ये खलिस्तान समर्थकांनी विरोध दर्शवला होता.

## १०० टक्के व्हिज्युअल डब ; मराठीसह सात भाषांमध्ये सादर होणार 'गोंधळ'

संतोष डावखर दिग्दर्शित 'गोंधळ' या चित्रपटाने आता जागतिक झेप घेतली आहे. 'गोंधळ' तब्बल ७ भाषांमध्ये डब झाला असून, व्हिज्युअल डब या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने तो मराठीसह तमिळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम, हिंदी आणि इंग्रजी या भाषांमधून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. अशा प्रकारे सादर होणारा हा पहिलाच भारतीय चित्रपट ठरत आहे. या चित्रपटाने सुरुवातीपासूनच आपल्या वेगळ्या आशयामुळे आणि प्रभावी मांडणीमुळे प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले होते. देश-विदेशातील विविध चित्रपट महोत्सवांमध्ये 'गोंधळ'ला मिळालेल्या प्रतिसादामुळे त्याची गुणवत्ता अधोरेखित झाली आहे.

उत्कृष्ट दिग्दर्शन, प्रभावी सिनेमॅटोग्राफी आणि दमदार कथानकासाठी या चित्रपटाला अनेक प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आले आहे. तसेच भारताकडून निवड होणाऱ्या ऑस्करच्या अधिकृत प्रवेशासाठीच्या स्पर्धेमध्ये 'गोंधळ' आपला सहभाग नोंदवणार आहे. व्हिएफएक्स





आणि एआयच्या माध्यमातून आवाजासह पात्रांच्या ओठांच्या हालचालीही त्या-त्या भाषेनुसार सुसंगत केल्या गेल्या आहेत. त्यामुळे प्रत्येक भाषेतील प्रेक्षकांना हा चित्रपट त्यांच्या स्वतःच्या भाषेत अधिक नैसर्गिक आणि जवळचा वाटेल, यावर निर्मात्यांनी काम केले आहे. यापूर्वी फक्त मुख्य कलाकारांसाठी व्हिज्युअल डबचा वापर करण्यात आला होता. मात्र 'गोंधळ'साठी शंभर टक्के व्हिज्युअल डबचा वापर करण्यात आला आहे. तसेच या व्हिएफएक्सच्या सगळ्या प्रक्रियेसाठी सुमारे सहा महिन्यांचा कालावधी लागला आहे. दिग्दर्शक संतोष डावखर म्हणतात,"गोंधळ' चित्रपट हा आपल्या मातीचा,संस्कृतीचा आणि भावनांचा एक प्रामाणिक प्रवास आहे. महाराष्ट्राची प्राचीन संस्कृती, समृद्ध परंपरा आणि 'गोंधळ'च्या कथानकातील थरार जगभरातील प्रेक्षकांना अनुभवता यावा, तसेच ही लोकसंस्कृती जतन व्हावी, या उद्देशानेच आम्ही, हा चित्रपट विविध भाषांमध्ये सादर करण्याचा प्रयत्न केला आहे. या माध्यमातून महाराष्ट्राची समृद्ध संस्कृती जागतिक पातळीवर पोहोचेल आणि आपल्या गोष्टींची ताकद अधिक ठळकपणे समोर येईल, याचा आम्हाला विशेष आनंद आहे."

# माझे गाव, आरोग्य संपन्न गाव अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद...

## जिल्हाभर एनसीडी तपासणी शिबिरांचे यशस्वी आयोजन

जनसंचलन/बुलढाणा

माझे गाव, आरोग्य संपन्न गावफ्फ या अभियानांतर्गत जिल्हाभर असंसर्गजन्य रोग () तपासणी शिबिरांचे व्यापक व यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला ग्रामीण भागातील नागरिकांचा उत्स्फ ूर्त प्रतिसाद मिळाला. हा उपक्रम मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या सूचनेनुसार तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. शिबिरांमध्ये नागरिकांची उच्च रक्तदाब, मधुमेह, ॲनिमिया, ईसीजी, कर्करोग तसेच सिकल सेल तपासणी करण्यात आली. गरोदर मातांची आरोग्य तपासणी करून त्यांना आवश्यक मार्गदर्शनही देण्यात आले. किशोरवयीन मुलींमध्ये लसीकरणाबाबत जनजागृती व समुपदेशन करण्यात आले असून लसीकरणासाठी प्रोत्साहन देण्यात आले. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर उष्माघात ( ) प्रतिबंधासाठी आवश्यक सूचना देत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.विविध तालुक्यांत शिबिरांचे आयोजन चिखली तालुका : प्राथमिक आरोग्य केंद्र अंत्री खेडेकर, एकालारा तसेच उपकेंद्र मंगरूळ नवघरे आणि धोत्रा नाईक येथे शिबिरे आयोजित करण्यात आली. बुलढाणा तालुका : प्राथमिक आरोग्य केंद्र रायपूर, वरवंड, पाडळी, हातेडी तसेच त्यांच्या अंतर्गत शिरपूर, दुधा, आम जांभ, आम पेठ, आम सावली, कोलवड, भडगाव, पिंपळगाव सराई, भादोला, पांगरी, दहिद बु. आणि मसला बु. येथे शिबिरांचे आयोजन करण्यात आले. याशिवाय शेगाव, खामगाव, देऊळगाव राजा, सिंदखेडराजा आणि इतर तालुक्यांमध्येही तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन शिबिरांची पाहणी केली. या उपक्रमात वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी तसेच आशा सेविकांनी सक्रिय सहभाग नोंदवत नागरिकांना आरोग्य तपासणीसह योग्य सल्ला व मार्गदर्शन दिले. असंसर्गजन्य रोगांचे () लवकर निदान व उपचार, सिकल सेल व ईसीजी तपासणी सुविधा, लसीकरणाबाबत जनजागृती व समुपदेशन, उच्च रक्तदाब, मधुमेह, ॲनिमिया व कर्करोग तपासणी, गरोदर माता आरोग्य तपासणी व मार्गदर्शन, उष्माघात प्रतिबंधासाठी जनजागृती, ग्रामीण स्तरावर आरोग्य सेवा अधिक सुलभ. या अभियानामुळे नागरिकांमध्ये असंसर्गजन्य आजारांविषयी जागरूकता वाढत असून लवकर निदान आणि वेळेवर उपचाराला चालना मिळत आहे. ञ्जमाझे गाव, आरोग्य संपन्न गावफ्फ हे अभियान ग्रामीण भागात आरोग्यदायी जीवनशैली निर्माण करण्यासाठी प्रभावी ठरत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# जिल्हास्तरीय लोकशाही दिन ४ मे रोजी

जनसंचलन/बुलढाणा

सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी, गाऱ्हाणी आणि प्रशासकीय अडचणींचे वेळेत निराकरण करण्यासाठी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सोमवार दि. ४ मे २०२६ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे ञ्जजिल्हास्तरीय लोकशाही दिनफ आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी आपल्या प्रलंबित समस्या मांडण्यासाठी या व्यासपीठाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. अर्जासाठी निकष : लोकशाही दिनात तक्रार सादर करताना नागरिकांनी विहित अर्ज केवळ शासनाने ठरवून दिलेल्या विहीत नमुन्यातच असावा, तक्रार किंवा निवेदन केवळ वैयक्तिक स्वरूपाचे असावे (सामूहिक स्वरूपाचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत), अर्जाच्या दोन प्रती, संबंधित लोकशाही दिनाच्या किमान १५ दिवस आधी सादर करणे आवश्यक आहे. तालुका लोकशाही दिनानंतर १ महिन्याने जिल्हा स्तरावर, तर जिल्हा स्तरांनंतर २ महिन्यांनी विभागीय आणि त्यानंतर २ महिन्यांनी मंत्रालयीन स्तरावर अर्ज करता येईल. कोणत्या तक्रारी स्वीकारल्या जाणार नाहीत. तसेच न्यायप्रविष्ट ( ) प्रकरणे, राजस्व अपील्स ( ), सेवाविषयक किंवा आस्थापना विषयक बाबी. अपूर्ण कागदपत्रे जोडलेले किंवा विहीत नमुन्यात नसलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. स्वीकारार्ह नसलेले अर्ज संबंधित विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी ८ दिवसांत पाठवून त्याची प्रत अर्जदारास दिली जाईल. व्हॉट्सॲप चॅटबॉट सुविधा : नागरिकांच्या सोयीसाठी प्रशासनाने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. आता नागरिक आपल्या तक्रारी आणि अर्ज ९४२३१८४८०४ या व्हॉट्सॲप क्रमांकावर चॅटबॉटद्वारे देखील सादर करू शकतात. जिल्ह्यातील नागरिकांनी आपल्या प्रलंबित समस्यांचे निराकरण करण्यासाठी या लोकशाही दिनाचा सकारात्मक लाभ घ्यावा, असे तहसिलदार एस.बी.मुपडे यांनी कळविले आहे.

# पाण्याचा काटकसरीने वापर करून जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य द्या- पालकमंत्री ना. मकरंद पाटील

## ७२९ गावे टंचाईग्रस्त घोषित १८ गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा, तर ५९ गावांमध्ये विहिरी अधिग्रहित

जनसंचलन/बुलढाणा




अल नीनोच्या प्रभावामुळे यंदाच्या मान्सूनबाबत अनिश्चितता निर्माण झाली असून उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. जलस्रोतांचे संवर्धन आणि भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देण्यात यावे, असे निर्देश राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी दिले. नियोजन भवन येथे पाणी टंचाईचा आढावा बैठकीत पालकमंत्री मकरंद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विधानसभा आमदार संजय गायकवाड, श्वेता महाले, मनोज कायंदे, सिद्धार्थ खरात, जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, जिल्हा पोलिस अधीक्षक निलेश तांबे, विभागीय वन अधिकारीजमीर शेख, यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री ना. पाटील यांनी पाणीटंचाईग्रस्त भागांमध्ये नागरिकांना नियमित व पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करण्याच्या सूचना दिल्या. ज्या गावांमध्ये पाणीटंचाई आहे, त्या गावांमध्ये जलजीवन मिशन योजनेंतर्गत कामे तातडीने पूर्ण करावीत. निधीअभावी प्रलंबित असलेली जलसंधारणाची कामे प्राधान्याने मार्गी लावावीत. आवश्यक अनुदानासाठी प्रस्ताव सादर करण्यात यावेत. प्रस्तावित तांत्रिक कामांना त्वरित मंजुरी देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी जबाबदारीने कार्य करावे. कामामध्ये हलगर्जीपणा करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, असे स्पष्ट निर्देश त्यांनी यावेळी दिले. पुढे ते म्हणाले की, संभाव्य कमी पावसाच्या पार्श्वभूमीवर शेततळे, नाला बांध दुरुस्ती, खोलीकरण, तलावातील गाळ काढणे तसेच जलस्रोत पुनर्भरणाची कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत. ग्रामीण भागात पाणी साठवण क्षमता वाढविण्यासाठी विविध उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. जिल्ह्यात नळगंगा, खडकपूर्णा व पेनटाकळी हे तीन मोठे प्रकल्प असून ७ मध्यम व ४१ लघु प्रकल्प असे एकूण ५१ प्रकल्प आहेत. मोठ्या प्रकल्पांमध्ये २७.३९ टक्के, मध्यम प्रकल्पांमध्ये ३८.२४ टक्के तर लघु प्रकल्पांमध्ये २७.२४ टक्के असा सरासरी ३०.६४ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. जिल्ह्याचा जून २०२६ पर्यंतचा पिण्याच्या पाण्याचा टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला असून ७२९ गावे टंचाईग्रस्त घोषित करण्यात आले आहेत. त्यापैकी सध्या १८ गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे, तर ५९ गावांमध्ये विहिरी अधिग्रहित करून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

# जिल्हास्तरीय खरीप हंगाम पूर्व नियोजन आढावा बैठक...

## खरीप हंगामासाठी सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करावे - पालकमंत्री ना. मकरंद पाटील

जनसंचलन बुलढाणा

आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना हवामानानुसार पीक नियोजन, बियाणे व खताची उपलब्धता तसेच शेतकऱ्यांना पीक लागवडीबाबत संपूर्ण मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात यावे. खरीप हंगामात शेतकऱ्यांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी दिले. नियोजन भवन येथे खरीप हंगाम पूर्व नियोजन २०२६-२७ चा आढावा पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी विधानसभा आमदार संजय गायकवाड, श्वेता महाले, मनोज कायंदे, सिद्धार्थ खरात, जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, जिल्हा पोलिस अधीक्षक निलेश तांबे, विभागीय वन अधिकारीजमीर शेख, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री ना. पाटील म्हणाले, आगामी काही दिवसांत मान्सून सक्रिय होणार असून खरीप हंगामाची कामे सुरू होतील. त्यामुळे जिल्ह्यात खते व बियाण्यांची मुबलक उपलब्धता ठेवून शेतकऱ्यांसाठी सूक्ष्म नियोजन करावे. यावर्षी



ङ्गअल नीनोफ्च्या प्रभावामुळे मान्सूनच्या सक्रियतेबाबत संभ्रम असल्याने पावसाच्या अनिश्चिततेचा विचार करून जलसंधारण, सूक्ष्म सिंचन आणि सिंचन व्यवस्थापनावर विशेष भर द्यावा. शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांवर अवलंबून न राहता फळबाग लागवड, भाजीपाला, बियाणे उत्पादन अशा पर्यायी पिकांना प्राधान्य द्यावे. विशेषतः कमी पाण्यात येणाऱ्या पिकांची निवड करावी. यासाठी कृषी विभागाने गावपातळीवर जनजागृती मोहीम राबवावी, असे निर्देश त्यांनी दिले. जिल्ह्यात ७ लाख ३९ हजार ७४० हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांची लागवड करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये ४ लाख ३५ हजार ५०० हेक्टरवर सोयाबीन, १ लाख २८ हजार २२० हेक्टरवर कापूस, ९९ हजार ५०० हेक्टरवर तूर तर ६३ हजार हेक्टरवर मक्याची लागवड होणार आहे. सोयाबीनसाठी ३ लाख २६ हजार ६२५ क्विंटल बियाण्याची आवश्यकता आहे. महाबीज, खाजगी कंपन्या तसेच शेतकऱ्यांकडील घरगुती बियाणे यांची उपलब्धता समाधानकारक असून आवश्यकतेनुसार बियाणे उपलब्ध करुन दिल्या जाईल, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष ढाबरे यांनी दिली. तसेच युरिया व डीएपीसह रासायनिक खतांचा पुरेसा साठा उपलब्ध असून आवश्यकतेनुसार खतांचा पुरवठा केला जाईल, असेही त्यांनी सांगितले. मान्सूनपूर्व काळात शेततळे, नाला बांध दुरुस्ती, खोलीकरण, तलावातील गाळ काढणे आदी जलसंधारणाची कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचनाही पालकमंत्री यांनी दिल्या. यावर्षी कमी पावसाची शक्यता लक्षात घेता जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य द्यावे. तसेच पशुधनासाठी चारा उपलब्धतेचे नियोजन करावे. खरीप हंगामात पिकांवर येणाऱ्या किडी व रोगांबाबत शेतकऱ्यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन देण्यात यावे. यासाठी कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी आणि कृषी सेवकांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधावा, असे निर्देश त्यांनी दिले.




### जेतवन बुद्धविहारासाठी आ.सिद्धार्थ खरात यांची १५ लाखांची विकासभेट; भव्य बुद्धमूर्ती प्रतिष्ठापना उत्साहात पार

जनसंचलन/मेहकर

मेहकर तालुक्यातील आरेगाव येथे दि. ३० एप्रिल रोजी जेतवन बुद्धविहारात तथागत गौतम बुद्ध यांच्या पवित्र मूर्तीची प्रतिष्ठापना आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते अत्यंत भक्तिमय व मंगलमय वातावरणात संपन्न झाली. या सोहळ्यामुळे संपूर्ण परिसरात आध्यात्मिक उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या वेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी बुद्धविहाराच्या सर्वांगीण विकासासाठी पुढाकार घेत १५ लाखांचा निधी जाहीर केला. यामध्ये १० लाखांचा भव्य डोम उभारणी, ५ लाखांची हायमास लाईट व्यवस्था तसेच विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका (स्टडी रूम) उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या सुविधांमुळे बुद्धविहार केवळ धार्मिक स्थळ न राहता शैक्षणिक व सामाजिक विकासाचे केंद्र बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमात बौद्ध भिक्खू गुणरत्न महाथेरो यांनी पंचशील व धम्मदेसना देत उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी बुद्धांच्या विचारांद्वारे समाजात शांतता, समता आणि बंधुता प्रस्थापित करण्याचे आवाहन केले. तसेच आमदार खरात यांच्या हस्ते भिक्खू गुणरत्न महाथेरो यांना चिवरदान करून सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी भागवत जाधव (राज्य महासचिव, भारत मुक्ती मोर्चा), उ.बा.ठा.चे विभाग प्रमुख पवन टाले आणि बाळा देशमुख हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. जेतवन बुद्धविहारातील बुद्धमूर्ती आरेगाव येथील टेकाळे परिवारातील अनिल टेकाळे, भास्कर टेकाळे, गजानन टेकाळे व प्रकाश टेकाळे यांच्या वतीने दान करण्यात आली, ही बाब विशेष उल्लेखनीय ठरली. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांसाठी खीर वाटप करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रम शांत, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गजानन लांडगे, दिलीप सदावर्ते, अनिल सदावर्ते, संदीप टेकाळे,